स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मानव्यविद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच्.डी.पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

"मराठवाड्यातील राजकीय नेतृत्त्व आणि राजपत्रित अधिकारी यांच्या संबंधाचा अभ्यास"

संशोधक

श्री धीरजकुमार दिगंबरराव कांबळे

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ.रत्नाकर बाबुराव लक्षटे

संशोधन मार्गदर्शक व विभगप्रमुख

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभा,

देगलूर महाविद्यालय, ता.देगलूर, जि.नांदेड.

संशोधन केंद्र

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग,

देगलूर महाविद्यालय, देगलूर, ता.देगलूर,

जि.नांदेड

मार्च २०१८

"मराठवाड्यातील राजकीय नेतृत्त्व आणि राजपत्रित अधिकारी यांच्या संबंधाचा अभ्यास"

१.१ प्रस्तावना :-

भारत हा हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत उत्तर-दक्षिण आणि पश्चिम समुद्रापासून ते म्यानमार (ब्रह्मदेश) पर्यंत पूर्व-पश्चिम पसरलेला आहे. भारत हा उपखंडासारखा विशाल देश असून जगातील एक प्राचीन संस्कृती म्हणून या देशाची जगभर ओळख आहे. प्राचीन काळी भारतात उद्योग व व्यापाराची भरभराट झाली. भारत हा देश 'सोने की चिड़ीया' म्हणून ओळखला जात होता. भारताचे हे आर्थिक ऐश्वर्य वृद्धिंगत होण्यास प्रशासकीय व्यवस्थादेखील कारणीभूत ठरली होती. भारतामध्ये प्राचीन काळापासून उत्कृष्ट प्रशासन व्यवस्था आणि सनदी अधिकाऱ्यांची पद्धती अस्तित्त्वात असल्याचे अर्थशास्त्र या ग्रंथातून स्पष्ट होते.

प्राचीन भारतात विकसित झालेल्या प्रशासकीय व्यवस्थेचे सविस्तर विवेचन अर्थशास्त्रात आढळते. मौर्य साम्राज्याच्या स्थापनेत आर्य चाणक्याने जो हातभार लावला तो त्याच्या प्रशासकीय व्यवस्थेवरून आणि सनदी अधिकाऱ्यांच्या पद्धतीवरून स्पष्ट होते. मौर्य साम्राज्याच्या विविधांगी कामात सुसुत्रता, व्यवस्थितपणा व कार्यक्षमता आणण्यासाठी लहान मोठी खाती (विभाग) निर्माण केलेली होती. अर्थ, संरक्षण, महसूल, कर, खाणी, उद्योग, व्यापार, दळणवळण, नाणी, पोस्ट, पोलीस, आरोग्य, पशुपालन, जनगणना व सार्जनिक कामे ह्या बाबींसाठी अनेक खाती व अधिकारी वर्ग होता. प्रत्येक खातेप्रमुखास 'अध्यक्ष' म्हणत. त्यांना सुमारे ४००० वार्षिक वेतन होते. अर्थशास्त्रात एकूण ३० अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे. लक्षणाध्यक्ष-टाकसाळ, लोहाध्यक्ष-लोहउद्योग, कोषाध्यक्ष-खजिना, लवनाध्यक्ष-मिठागार, सुवर्णाध्यक्ष-सुवर्णउद्योग, कुप्याध्यक्ष-जंगले, आयुधाध्यक्ष-शस्त्रास्त्रे, पौलवाध्यक्ष-वजन मापे, मानाध्यक्ष-वेळ व स्थानप्रमुख, सीताध्यक्ष-सरकारी शेतीप्रमुख, सूत्राध्यक्ष-विणकाम, सुराध्यक्ष-मदिरा उद्योग, मुद्राध्यक्ष-परवाना प्रमुख, विनिताध्यक्ष-कुरणे, नवाध्यक्ष-पशु निरीक्षक, नौकाध्यक्ष-नौकानयन, पट्टनाध्यक्ष-बंदरे, गणिकाध्यक्ष-गणिका, दासी व्यवसाय प्रमुख,

संस्थाध्यक्ष-व्यापार, उद्योग, देवताध्यक्ष-धर्मस्थळ, अकराध्यक्ष-करप्रमुख, बंधनगाराध्यक्ष-जेलप्रमुख, कोष्ठागाराध्यक्ष, पण्याध्यक्ष-सरकारी व्यापार, शुल्काध्यक्ष-मुद्रा, कर वसुली, सूनाध्यक्ष-कत्तलखाना, द्युताध्यक्ष-द्यूतप्रमुख आणि पदाती, रथदळ, अश्वरळ व हस्तीदळप्रमुख इ. अनेक विभागांचे अधिकारी शासनात नियुक्त केलेले होते.

आधुनिकतेची वैशिष्ट्ये चंद्रगुप्ताच्या प्रशासन व्यवस्थेत दिसून येतात. साम्राज्याच्या दैनंदिन कारभार चालविण्यासाठी केंद्रीय 'सचिवालयाची' स्थापना केलेली होती. हे कार्यालय पाटलीपुत्र ह्या राजधानीच्या ठिकाणी होते. मौर्य काळापर्यंत लेखनकला विकसित झालेली होती. त्यामुळे बराच राज्यकारभार लेखी पद्धतीने होत असावा. चंद्रगुप्तकालीन विविध खाती व त्यांचा पदाधिकारी वर्ग ह्या सचिवालयातील कार्य करीत असावा. कारण सचिवालयात विविध खात्यांचे अध्यक्ष व कारकुन हजारोंच्या संख्येने होते. लेखक नावाचे अधिकारी सचिवालयात असून 'लेखनिक' नावाचा मोठा कारकून वर्ग होता. राजाची ध्येय धोरणे व राजा जनतेपर्यंत पोचविण्याचे कार्य सचिवालय करीत होते.

चंद्रगुप्ताच्या साम्राज्यात 'विजित' म्हणजे जिंकून प्रत्यक्ष वर्चस्वाखाली आणलेले व 'प्रत्यंत' म्हणजे मौर्याचे मांडलिकत्व (प्रभुत्व) स्वीकारलेले परंतु अंतर्गत स्वातंत्र्य असलेले, ह्या दोन प्रकारचे प्रदेश होते. त्यांची शासनव्यवस्था भिन्न होती. चंद्रगुप्ताच्या प्रांतीय प्रशासनाची स्पष्ट माहिती मिळत नाही आणि प्रांताची ठराविक संख्याही सांगता येत नाही. उलट नंतरच्या अशोककालीन प्रांताधारे त्यांच्या प्रातांचा अंदाज बांधावा लागतो. अशोकाच्या काळात एकूण पाच प्रांत होते. चंद्रगुप्ताच्या वेळी कलिंग प्रांत साम्राज्यात नव्हता. म्हणून त्याच्या काळात पुढील चार प्रांतच अस्तित्त्वात होते. (अ) उत्तर वायव्य विभाग राजधानी तक्षशीला (ब) अवंती राष्ट्र -उज्जैनी (क) दक्षिणापथ-सुवर्णगिरी व (ड) मध्यपूर्व किंवा प्राच्य-पाटलीपुत्र हे साम्राज्याचे प्रांतीय विभाग होते. त्यावर 'कुमाराच्या' नेमणुका केलेल्या होत्या. त्यांच्या मदतीसाठी मंत्रीमंडळ, लष्कर व अमात्य नावाचे अधिकारी होते. शांतता, सुव्यवस्था (प्रशासन) व संरक्षण ही त्यांची प्रमुख कामे होती. प्रांताची 'प्रदेशात' विभागणी केलेली होती. त्यांच्या प्रमुखास

'प्रादेशिक' म्हणत. प्रदेशाचे पुन्हा विभाग होते. ते ग्राम संख्येवरून तयार केलेले होते. स्थानिक-८०० ग्राम, द्रोणमुख-४०० ग्राम, खार्वारिक-२०० ग्राम, संग्रहण-१०० ग्राम व गोप-१० ग्राम अशी प्रदेशाची विभागणी केलेली होती. 'ग्राम' हा साम्राज्याचा शेवटचा व स्वतंत्र घटक होता. ही माहिती अर्थशास्त्रामधून मिळते. प्रांतात नवीन जिंकलेली जनपद (विजित) राज्ये, गणराज्ये व मांडलिक राज्यांचा समावेश होता. तेथील शासनात पारंपरिक पद्धतीला महत्त्व दिलेले होते. कार्यक्षम गुप्तहेराच्या मदतीने सम्राट प्रांत व त्यातील उपविभागावर नियंत्रण ठेवीत असे.

हा साम्राज्याचा स्वंयपूर्ण घटक होता. १० ग्रामांचा प्रमुख असलेला 'गोप' नावाचा अधिकारी खेड्यावर नियंत्रण ठेवीत होता. परंतु खेड्यांना भरपूर स्वातंत्र्य होते. ग्रामणी व ग्रामसभा खेड्यांचा कारभार चालवीत. श्रीमंत शेतकरी वर्गातून ग्रामणीची निवड केली जाई. हे पद वंशपरंपरागत होते. कामाचा मोबदला म्हणून त्यांना वतने (जमिनी) दिलेली होती. अयोग्य ग्रामणीला राजा बडतर्फ करू शकत असे. त्यांच्या मदतीला कारकून (सारा वसूल करणारा), पहारेकरी व लेखक हे वतनी अधिकारी होते. त्यांच्याही नेमणुका वंशपरंपरागत होत. खेड्याचे संरक्षण, सारा वसुली व न्यायदान ही कामे ग्रामणी व त्याचे सहकारी करीत. प्रत्येक ग्रामाच्या व्यवस्थेसाठी लोकप्रतिनिधीची 'ग्रामसभा' होती. कांही विद्वानांच्या मते ह्या ग्रामसभा म्हणजेच 'ग्रामपंचायती' होत. खेड्यातील प्रतिष्ठित लोकांची ग्रामसभेच्या सभासदासाठी निवड केली जाई. 'ग्रामणी' हा ग्रामसभेचा अध्यक्ष होता. जमिनीची लागवड, पाणी पुरवठा, दुष्काळ, जनगणना, धर्मशाळा, रस्ते, मनोरंजन, न्यायनिवाडा व देवस्थानाची व्यवस्था ही कामे ग्रामसभा करीत असे. शेतसारा, दंड, देणग्या, राजाचे अनुदान व महसुलाचा काही भाग ग्रामसभेच्या उत्पन्नाची साधने होती.

मेगॅस्थेनिजने 'इंडिका' ग्रंथात पाटलीपुत्र नगरीचे सविस्तर वर्णन केलेले आहे. प्रांताच्या राजधान्या व साम्राज्यातील शहराची व्यवस्था पाटलीपुत्राच्या धर्तीवर असावी असे अनुमान काढता येते. नगर व्यवस्थेसाठी ३० सभासदांच्या 'पौरसभा' होत्या. त्यातून पांच सदस्यांच्या

सहा समित्या बनविलेल्या होत्या. (अ) कारागीर-कलावंतासाठी एक समिती नियुक्त केलेली होती. पाटलीपुत्र नगरी संपन्न होती. साम्राज्यातील कारागीर तेथे स्थायीक होऊन कलात्मक वस्तुनिर्मितीचा उद्योग करीत. धातुच्या वस्तू, लाकूड कामे व अलंकार बनविणारे भरपूर कारागीर शहरात होते. उत्पादन व त्यांच्यावर देखरेख ठेवण्यासाठी ही समिती होती. मजूर, कारागिरांचे वेतन, नुकसानभरपाई, सुरक्षितता व मजूर कल्याणाची जबाबदारी तिच्यावर होती. (ब) परदेशी पाहुणे व व्यक्तींची व्यवस्था पाहण्यासाठी नगर प्रशासनात स्वतंत्र समिती होती. त्यांचे भोजन, निवास, सुरक्षा, अंत्यविधी (मृत्यू झाल्यास) व संपत्तीची व्यवस्था ही समिती करीत होती. (क) शहरातील जनतेची इत्यंभूत माहिती ठेवणारी 'जनगणना' समिती होती. लोकसंख्या, जन्ममृत्यूची नोंद व व्यक्तीची इतर माहिती ही समिती ठेवीत होती. शासनाच्या सोयीसाठी ही माहिती अत्यंत उपयुक्त होती. शिक्षण व समारंभाची कामे ह्यांची काळजी ही समिती घेत असे. (इ) उत्पादित वस्तुंचे निरीक्षण, किमती, भेसळ, वस्तुचा दर्जा व वजन-मापे ह्याकडे लक्ष पुरविणारी पांचवी समिती होती. (ई) खरेदी-विक्री व्यापारावर नियंत्रण ठेवून विविध प्रकारचे कर वसूल करणारी सहावी समिती होती. धार्मिक कर तीच गोळा करीत असे. हा कर देण्यासाठी कुणी कुचराई केल्यास मृत्युदंडाची शिक्षा होती. सार्वजनिक ठिकाणे, मंदिरे, बाजारपेठा, बंदरे, रस्ते, दिवाबत्ती, स्वच्छता, आरोग्य, स्मशानभूमी, मनोरंजन, उत्सव व समारंभ, इतर कामे देखील वरील पौरसभा करीत असे.

मेगॅस्थेनिजच्या कथनानुसार पाटलीपुत्र शहर भव्य, सुंदर व सुखसोयींनी युक्त होते. शहरात वैयक्तिक, सार्वजनिक व राजवाड्याच्या इमारती आहेत. ही नगरी गंगा व शोण नदीच्या संगमावर वसलेली असून ९-१/२ मैल व लांब १ मैल रूंद आहे. शहराच्या भोवती लाकडी तटबंदी आहे आणि संरक्षणासाठी पलीकडे ६००' रूंद व ६०' खोल खंदक आहे. शहरात ५७० बुरूज व ६४ वेशी असून मोठमोठ्या बाजारपेठा(संग्रहण) आहेत. शहर प्रमुखास 'नागरिक' म्हणतात आणि शांततेसाठी 'रचिन' नावाचे पोलीस दल आहे. अशी माहिती मेगॅस्थेनिजने दिलेली आहे.

१.२ संशोधनाचे महत्त्व :-

भारतात उत्तरेकडील भागात हिंदुकुश पर्वतापासून ते पाटलीपुत्रपर्यंत असणारा महामार्ग 'उत्तरापथ' म्हणून ओळखला जात होता. तर दक्षिणेतील महामार्ग 'दक्षिणापथ' म्हणून ओळखला जात असे. याशिवाय आंतरराष्ट्रीय महामार्गाच्या स्वरूपात तक्षशीलेपासून ते इस्तंबूलपर्यंत जाणारा व्यापारी महामार्ग 'खुश्कीचा मार्ग' (Silk Route) म्हणून प्रसिद्ध होता. या मार्गाने भारतातील पक्का माल इसतंबूल येथे जाऊन युरोपातील व्यापारी इस्तंबूल येथील व्यापाऱ्यांकडून भारतातील उत्कृष्ट माल खरेदी करीत असत. मध्ययुगीन काळात इस्तंबूल तुर्कांनी जिंकल्यानंतर युरोपीय व्यापाऱ्यांना खुश्कीचा मार्ग बंद झाला व समुद्रमार्गाने भारताकडे येण्याचे प्रयत्न सुरू झाले. पाश्चात्त्य देशातील इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज आणि डच यांच्या आपसातील लढाया समुद्री मार्गावर वर्चस्व स्थापित करण्यासाठीच झालेल्या आहेत. याप्रमाणे एखाद्या देशाचा आर्थिक विकास, आर्थिक विकासाशी निगडीत असलेली प्रशासकीय व्यवस्था व त्यातील सनदी अधिकारी यांच्यावर अवलंबून असे.

कोणत्याही सार्वभौम राष्ट्राला जलद आर्थिक विकासाची ओढ लागलेली असते. आर्थिक विकास हा कृषी आणि औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असतो आणि या क्षेत्रांचा विकास पायाभूत क्षेत्रांच्या विकासावर अवलंबून असतो. म्हणून आर्थिक विकासाच्या पहिल्या टप्प्यात पायाभूत संरचनेच्या विकासाला प्राधान्य दिले जाते. जसे एखादी इमारत उभी करताना तिच्या पायाच्या मजबुतीवर अधिक भर दिला जातो. पाया जितका मजबूत तितकी इमारत दीर्घकाळ टिकणारी असते. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेचा पाया जितका मजबूत असेल तितका आर्थिक विकासाचा वेग जास्त राहतो आणि अर्थव्यवस्थेचा सार्वत्रिक विकास होतो. अर्थव्यवस्थेची सबलता किंवा दुर्बलता पायाभूत संरचनेच्या विकासावर अवलंबून राहते. पायाभूत संरचनेचा विकास प्रशासकीय व्यवस्थेवर अवलंबून असतो.

थोडक्यात अर्थव्यवस्था क्रियाशील राहण्यासाठी व तिच्या वृद्धिसाठी पायाभूत सुविधांमध्ये मुख्यतः ऊर्जा, पाणी, दळणवळण, वित्तीय सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि

दूरसंचार यांचा समावेश होतो. ग्राहकांना उच्च दर्जाच्या पायाभूत सेवा वाजवी दरात उपलब्ध करणे हे अंतिम लक्ष्य दृष्टिसमोर ठेवून देशातील वेगवेगळ्या क्षेत्रात पायाभूत सुविधांची वाढ होणे अपेक्षित आहे. जसे औद्योगिक क्षेत्राच्या विकासात पायाभूत संरचनेचे दोन भाग करता येतील, एक म्हणजे पायाभूत उद्योग यात मूलभूत आणि अवजड उद्योग (लोह-पोलाद उद्योग, धातू उद्योग, सिमेंट, कोळसा, कागद, अभियांत्रिकी उद्योग) यांचा समावेश केला जातो. तर दुसरे म्हणजे पायाभूत सेवा यसामध्ये वाहतूक व दळणवळण सेवा, बँक व वित्तीय सेवा, विमा सेवा यांचा समावेश केला जातो. कृषी क्षेत्रात जलसिंचन, रासायनिक खते, विक्री व्यवस्था व साठवणूक व्यवस्था यांचा पायाभूत संरचनेत समावेश केला जातो. याच्या विकासावरच कृषी विकास अवलंबून असतो. कृषी आणि औद्योगिक विकासाबरोबरच मानवी संसाधनाच्या विकासावरही आर्थिक विकास अवलंबून असतो. मानवी संसाधनाच्या विकासात शिक्षण, प्रशिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता यांचा पायाभूत संरचना म्हणून वापर केला जातो.

अशाप्रकारे देशाचा आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकास ज्या घटकांवर अवलंबून असतो त्यामध्ये शासन व प्रशासकीय व्यवस्था महत्त्वाची असते त्यातही राजकीय नेतृत्त्व व राजपत्रित अधिकारी यांचे महत्त्व अनन्यसाधारण असते. प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या राजपत्रित अधिकाऱ्यांचा संबंध राजकीय व्यक्तींशी वेळोवेळी येत असतो. तसेच अशा व्यक्तींचा राजपत्रित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रभावही पडतो. हे लक्षात घेता संशोधकाने "महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्त्व आणि राजपत्रित अधिकारी यांच्या संबंधाचा चिकित्सक अभ्यास" हा विषय अभ्यासासाठी निवडण्याचे प्रायोजित केले आहे.

१.३ संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :-

महाराष्ट्रातील प्रशासन राजपत्रित सेवा भारतीय लोकप्रशासनाचा आधारभूत घटक आहे. शासनाचे धोरण ठरविण्यात मदत करण्यापासून त्याची अंमलबजावणी करण्याच्या सर्व व्यवहारांचे व्यवस्थापन करणारा घटक म्हणजे भारतातील राजपत्रित सेवा होत. फायनर यांच्या

मते, सनदी सेवा या स्थायी, वेतनिक, कुशल आणि व्यावसायिक स्वरूपाच्या असतात. राजपत्रित सेवांनाच नागरी सेवा असेही म्हटले जाते. या सेवा 'लोकसेवा' म्हणूनही ओळखल्या जातात. या सेवा लष्करी स्वरूपाचे कार्य करणाऱ्या नसतात म्हणून त्यांना नागरी सेवा असेही म्हणतात.

कर्मचारी वर्ग प्रशासनात नागरी सेवांचा सामान्य रूपाने केलेला अभ्यास महाराष्ट्रातील प्रशासनाशी कसा निगडीत आहे हे पाहणे आवश्यक ठरते. तसेच महाराष्ट्रातील प्रशासकीय सनदी सेवेची कार्यपद्धती व सनदी अधिकाऱ्यांचे प्रश्न यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. भारतीय सनदी सेवा आधुनिक स्वरूपात ब्रिटिश राजवटीपासून सुरू झाली आहे. सन १८३१-३२ या काळात ईस्ट इंडिया कंपनीने या सेवा सुरू केल्या. तर पुढे १९४८ मध्ये याची पुनःर्रचना करण्यात आली. या सेवा २ भागात विभागल्या जातात -

१) सचिवालयीन सेवा

२) लिपीक वर्ग सेवा

या सेवांचे चार वर्ग केले जातात. ते पुढीलप्रमाणे -

१) प्रथम वर्ग सेवा

२) द्वितीय वर्ग सेवा

३) तृतीय वर्ग सेवा

४) चतुर्थ वर्ग सेवा

प्रस्तुत संशोधनाविषयाची व्याप्ती व मर्यादा खालील मुद्यांआधारे स्पष्ट करता येईल.

प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र हे मराठवाड्यापुरतेच मर्यादित आहे.

प्रस्तुत संशोधन विषय मराठवाड्यातील राजकीय नेतृत्त्व व राजपत्रित अधिकारी यांच्याच संबंधाचा अभ्यास करणारे आहे.

प्रस्तुत संशोधनाचा विषय मराठवाड्यातील प्रथम व द्वितीय श्रेणीतील राजपत्रित अधिकारी आणि राजकीय नेतृत्त्व यांच्यातील संबंधाशी संबंधित आहे.

संशोधन कार्यात सुटसुटीतपणा व नेटकेपणा यावा जेणेकरून संशोधनाची दिशा स्पष्ट व्हावी म्हणून वरीलप्रमाणे संशोधनाची व्याप्ती व मर्यादा ठरविली आहे.

१.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :-

१) राजकीय नेतृत्त्व व राजपत्रित अधिकारी यांच्या संबंधचा अभ्यास करणे.

२) मराठवाड्यातील राजकीय नेतृत्त्वाच्या जडणघडणीत प्रभावित करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

३) मराठवाड्यातील राजकीय नेतृत्त्व व राजपत्रित अधिकारी यांच्या संबंधाला प्रभावित करणारे घटक तपासणे.

४) मराठवाड्यातील राजपत्रित अधिकारी व राजकीय नेतृत्त्व यांच्या संदर्भातील परिचयात्मक आराखडा देणे.

५) मराठवाड्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या निवड प्रक्रियेतील राजकीय नेतृत्त्वाच्या प्रभावाचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

६) मराठवाड्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर पडणाऱ्या राजकीय नेतृत्त्वांच्या प्रभावांचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

७) महाराष्ट्रातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या निर्णय घेण्याच्या पद्धतीवर पडणाऱ्या राजकीय नेतृत्त्वाच्या प्रभावाचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

८) मराठवाड्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांचे राजकीय नेतृत्त्वांशी असलेल्या सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक व व्यक्तिगत स्वरूपांच्या संबंधाचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

९) मराठवाड्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय सेवेत येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यात होणाऱ्या राजकीय नेतृत्त्वांच्या मदतीचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे.

१०) निष्कर्ष मांडणे व शिफारशी देणे.

१.५ संशोधनाची गृहितके :-

प्रस्तुत संशोधनाची गृहितके खालीलप्रमाणे असतील :-

१) मराठवाड्याच्या प्रशासकीय व्यवस्थेतील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या निवड प्रक्रियेवर राजकीय नेतृत्त्वाचा प्रभाव दिसतो.

२) मराठवाड्याच्या प्रशासकीय व्यवस्थेतील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीत राजकीय नेतृत्त्वाचा हस्तक्षेप होतो.

३) मराठवाड्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या लोकोपयोगी योजनांच्या अंमलबजावणीवर राजकीय नेतृत्त्वांचा प्रभाव पडतो.

४) मराठवाड्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांचे राजकीय नेतृत्त्वांशी असलेले संबंध नकारात्मक तसेच सकारात्मक अशा दोन्ही अंगानी परिणामकारक ठरतात.

५) मराठवाड्यातील राजकीय नेतृत्त्वाने राजपत्रित अधिकाऱ्यांना आपल्या अंकित ठेवले.

१.६ संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधन ऐतिहासिक सर्वेक्षण स्वरूपाचे असून यात वर्णनात्मक पद्धतीचाही उपयोग करण्यात येईल. सांख्यिकीय विश्लेषण पद्धतीचा वापर या संशोधनाचे वैशिष्ट्ये असेल. हे लक्षात घेऊन संशोधन पद्धती निवडण्याचे ठरविले आहे ती खालीलप्रमाणे असेल :-

संशोधनाच्या माहितीचे स्त्रोत :-

प्रस्तुत संशोधन हे ऐतिहासिक, अनुभवजन्य क्षेत्रिय निरीक्षणाच्या स्वरूपाचे संशोधन असल्यामुळे संशोधकाने अशा संशोधनास अनुकूल ठरणाऱ्या संशोधन पद्धतीची निवड करण्याचे ठरविले आहे. संशोधनासाठी प्राथमिक तथ्य संकलन व दुय्यम तथ्य संकलनाच्या विविध मार्गांचा अवलंब करण्यात येईल.

(अ) माहितीचे प्राथमिक स्त्रोत :-

प्राथमिक माहिती स्त्रोतात निरीक्षण, मुलाखत आणि प्रश्नावली ही प्रमुख साधने वापरली जातील. मराठवाड्यातील प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या निवडक राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी तसेच निवडक राजकीय नेतृत्त्वांसाठी स्वतंत्र प्रश्नावली तयार करून माहिती मिळविण्याचे निश्चित केले आहे.

(ब) माहितीचे दुय्यम स्त्रोत :-

दुय्यम माहिती स्त्रोतात मराठवाड्यातील विविध प्रशासकीय विभागांच्या अहवालांचा तसेच व्यक्तिगत साधने, सार्वजनिक साधने व इतर साधनांचा वापर करण्यात येईल.

संशोधनाची नमूना निवड :-

संशोधनकर्त्याने संशोधनासाठी नमूना निवड करण्यासाठी स्तरीय यादृच्छिक नमूना निवड पद्धतीप्रमाणे वापरण्यात येईल.

जनसंख्या व न्यादर्श :-

मराठवाड्यातील एकूण राजपत्रित अधिकारी तसेच राजकीय पक्षांचे नेतृत्त्व ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या असेल. मराठवाड्यातील सद्य:स्थितीतील राजपत्रित अधिकारी व ग्रामीण आणि शहरी भागातील राजकीय नेतृत्त्वापैकी काहींची लॉटरी पद्धतीने निवड करण्यात येईल.

तथ्य संकलनाचे सांख्यिकीय विश्लेषण :-

प्रस्तुत संशोधनात सांख्यिकीय विश्लेषण पद्धतीचा तसेच तथ्य संकलनाची विश्वसनियता तपासण्यासाठी सांख्यिकीय पद्धती वापरण्यात येईल.

१.७ संशोधनाच्या प्रकरणांची मांडणी :-

प्रस्तुत संशोधनाच्या प्रकरणांची मांडणी खालीलप्रमाणे आहे :-

प्रकरण पहिले - विषयप्रवेश

प्रकरण दुसरे - मराठवाडा आणि राजकीय नेतृत्त्व : एक विश्लेषण

प्रकरण तिसरे - राजकीय नेतृत्त्व व राजपत्रित अधिकारी : संकल्पनात्मक विवेचन

प्रकरण चौथे - राजकीय नेतृत्त्व व राजपत्रित अधिकारी : सहसंबंधीय विश्लेषण

प्रकरण पाचवे - राजकीय नेतृत्त्व व राजपत्रित अधिकारी संबंधाची परिणामकारकता

प्रकरण सहावे - मराठवाड्यातील राजकीय नेतृत्त्व व राजपत्रित अधिकारी संबंधाचे स्वरूप व चिकित्सा

प्रकरण सातवे - निष्कर्ष व शिफारशी

उपरोक्त संशोधन आराखड्यात संशोधन कालावधीदरम्यान उपलब्ध होणाऱ्या साहित्यानुसार बदल होऊ शकतो.

१.८ संदर्भग्रंथसूची :-

१) पाटील व्ही.बी., "प्रशासन व्यवस्था", फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२) दर्शनकार अर्जूनराव, "पंचायतराज व नागरी प्रशासन", कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद.

३) महाराष्ट्र विधीमंडळ दस्तावेज (विधीमंडळ चर्चा), मुंबई, १९९४,

४) जोरगूलवार भूषण, "निवडक देशांची शासनप्रणाली", लातूर.

५) देशमुख बी.टी. आणि काने पी.सी., "शासन व्यवहार आणि शासन योग", क्षीतिज प्रकाशन, नागपूर.

६) बंग के.आर., "भारतीय प्रशासन", कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद.

७) Desai Vasant, "Panchayatraj : Power to the People", Himalaya Publishing House, Bombay.

८) Grover Virender, "Political System in India", Vol.I, Approaches to Indian Politics and Constitutional, Making Deep and Deep Publications, New Delhi.

९) Maheshwari Shriram, "Indian Administrations", Orient Longman Pvt. Ltd; Bombay.

१०) कुलकर्णी बी.वाय. आणि नाईकवाडे अशोक, "भारताचे शासन आणि राजकारण", श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.रत्नाकर बाबुराव लक्षटे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय, देगलूर,
जि. नांदेड.

संशोधक

श्री धीरजकुमार दि. कांबळे